Tangalwad

# Research Paper Published In Journal Academic Year 2021-22

DO NOT COPY

# KNOWLEDGE RESONANCE

ISSN : 2231-1629
A HALF YEARLY PEER REVIEWED REASERCH JOURNAL
(Evaluated in the SJIF Journal Masters List Evaluating Process with Impact Factor of 8.072 for Year 2021 )

A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal



Knowledge is the Premise of Progress in Every Society, in Every family

Vol 11 No.1 Jan -June 2022

Research Journal Publication Committee
Dr. M. K. Umathe College, Nagpur

| | | |
|---|---|---|
| 28 | आदिवासी महिलांच्या शैक्षणिक विकासातील शासकीय योजनांचे योगदान रु एक अभ्यास<br>डॉ. दत्ता एम. तंगलवाड | 114 |
| 29 | ना. बाळासाहेब थोरात यांचे ई – पीक पाहणी प्रकल्पातील योगदान<br>प्राचार्य, डॉ. राजधर टेमकर** नवनाथ विठोबा नागरे* | 120 |
| 30 | शाश्वत विकासावर दृष्टीक्षेप<br>प्रा. डॉ. सुरेन्द्र पोथारे | 123 |
| 31 | नोकरी करणाऱ्या महिलांच्या समस्यांनचे समाजशास्त्रीय अध्ययन<br>प्रा. प्रियंका राजेंद्र आठे | 126 |
| 32 | असंघटीत महिला कामगारांचे प्रश्न<br>प्रा. डॉ. सुरेश एम. डोहणे | 131 |
| 33 | पंतप्रधान उज्ज्वला गॅस योजनेचा ग्रामीण महिलांच्या जीवनावर झालेला परिणाम : एक समाजशास्त्रीय विश्लेषण<br>प्रा. व्ही. एन. कांबळे | 135 |
| 34 | शांतता शिक्षणासाठी बी. एड्. प्रशिक्षणार्थीच्या वर राबविण्यात आलेल्या उपक्रमांच्या विकासात्मक कार्याचा अभ्यास<br>प्राचार्य डॉ. पांढरे विद्युलता ज्ञा.* श्रीमती सुनिता जोगधनकर** | 138 |
| 35 | भ्रष्टाचार: स्त्रियांचे हक्क, स्वरूप आणि वास्तव<br>डॉ. विकास वैजिनाथ टाचले | 142 |
| 36 | पंचायती राज आणि 73 वी घटनादुरूस्ती<br>डॉ. रक्षा महाजन | 145 |
| 37 | मराठवाडा मुक्ती संग्रामातील विविध नेत्यांचे योगदान<br>प्रा. डॉ. सुषमा देशपांडे | 153 |
| 38 | भारतीय स्त्रियांचे सामाजिक, शैक्षणिक व राजकीय विश्लेषण<br>डॉ. शेख जहारा अब्दुल रहीम | 156 |

ISSN 2231-1629 Knowledge Resonance
IMPACT FACTOR 8.072
January-June 2022- Vol. 11 No. 1

# आदिवासी महिलांच्या शैक्षणिक विकासातील शासकीय योजनांचे योगदान : एक अभ्यास

डॉ. दत्ता एम. तंगलवाड
सहयोगी प्राध्यापक तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख
महिला महाविद्यालय गेवराई ता. गेवराई जि. बीड-४३११२७

**प्रस्तावना-**

आदिवासी समुदाय हा प्रारंभिक अवस्थेत पासूनच अतिशय दुर्गम भागात वास्तव्य करणारा, प्रगत समाजाच्या संपर्कापासून अलिप्तच असलेला, निसर्गाच्या सानिध्यांत जीवन जगणारा,रूढी प्रथा परंपरा यांची व अंधश्रद्धांचे प्राबल्य असलेला समुदाय म्हणून ओळखला जातो विशिष्ट बोलीभाषा वेशभूषा केशभूषा विवाह पद्धती या बाबतीत प्रगत समाजापेक्षा कमालीची भिन्नता असलेली जीवनपद्धती पिढ्यान् पिढ्या पासून आदिवासी समुदाय जोपासत आलेला आहे. "भारतात आदिवासी जमाती मोठ्या प्रमाणात असून त्या भारतभर पसरलेल्या आहेत त्यांची संख्या सुमारे ६९८ आहे."[1] आदिवासी लोक प्रगत समाजाच्या संपर्कात आले तर त्यांच्या जीवन पद्धतीमध्ये बदल होतो त्यांचे शारीरिक, मानसिक, आर्थिक शोषण होते. म्हणून त्यांना पृथक ठेवून त्यांचा विकास घडवून आणायला हवा अशा प्रकारचे मत वेरियर एल्विन यांनी मांडलेले आहे तर डॉ.जी.एस घुर्ये म्हणतात 'आदिवासींच्या विकास घडवून आणण्यासाठी त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणले पाहिजे' तर डी. एन.मुजुमदार म्हणतात 'आदिवासी समुदाय गरीब,मागासलेला असून त्यांच्या कल्याणासाठी काळजीपूर्वक एकीकरण केले पाहिजे. म्हणजे आदिवासी समुदाय सभ्य समाजातील सकारात्मक बाबीचा स्वीकार करेल आणि स्वतःच्या सामाजिक व सांस्कृतिक वारसा जतन करेल.' म्हणून भारत सरकारने वेगवेगळ्या विचार प्रवाहपैकी एकीकरणाचे धोरण स्वीकारून आदिवासींच्या विकासासाठी वेगवेगळ्या प्रकारच्या कल्याणकारी योजना राबवल्या. केंद्र सरकारने स्वतंत्र आदिवासी विकास विभागाची स्थापना करून आदिवासी समुदायासाठी विविध योजना राबवण्यात आल्या. आदिवासी समाजातील सर्व जमातींचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी शासनाने वेगवेगळ्या प्रकारच्या योजना आणि धोरणे राबवले असून प्रस्तुत शोधनिबंधामध्ये केवळ महिलांसाठी राबवलेल्या शैक्षणिक योजना आणि धोरणांचा आढावा घेण्यात आला आहे.

**संशोधन विधान-**

आदिवासी महिलांच्या शैक्षणिक विकासात शासकीय योजनांचे योगदान - एक अभ्यास.

**संशोधन पद्धती -**

प्रस्तुत संशोधनात संशोधन विषयाच्या अनुषंगाने शास्त्रीय पद्धतीच्या आधारे माहिती संकलन करण्यासाठी विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला.

**संशोधनाची क्षेत्र मर्यादा -**

प्रस्तुत संशोधनात वस्तुनिष्ठ तथ्ये संकलन करून निष्कर्षाप्रत जाण्यासाठी संशोधनाचे क्षेत्र मर्यादा निश्चित करण्यात आली.भारतात आदिवासी महिलांच्या शैक्षणिक विकासात शासकीय योजनांचे योगदानाचा अभ्यास संशोधनाची ही क्षेत्र मर्यादा निश्चित करण्यात आली.

**तथ्य संकलनाची साधने –**

प्रस्तुत संशोधनात तथ्ये संकलनासाठी संदर्भग्रंथ, नियतकालिके, पुस्तके, यांचा आढावा घेण्यात आला.तसेच सहभागी निरीक्षणाचा आधार घेण्यात आला.

**संशोधनाची उद्दिष्टे -**

प्रस्तुत संशोधनात आदिवासी महिलांच्या शैक्षणिक विकासाचा आढावा घेत असताना पुढील उद्दिष्टांची मांडणी करण्यात आलेली आहे.

१. आदिवासी महिलांच्या शैक्षणिक विकासासाठी शासनाने राबवलेल्या विविध योजनांचा अभ्यास करणे.
२. आदिवासी समाजातील महिलांच्या प्रगतीसाठी असलेल्या विविध योजनांच्या अंमलबजावणीतील उणिवांचा अभ्यास करणे.
३. आदिवासी महिलांच्या शैक्षणिक विकासासाठी असलेल्या योजना गरजूंपर्यंत पोहोचल्या का ? याचा आढावा घेणे.

**संशोधनाची गृहितके -**

कोणत्याही संशोधनामध्ये गृहीतकाची केलेली मांडणी ही संशोधनाला विशिष्ट दिशा प्राप्त करून देत असते. म्हणून

प्रस्तुत संशोधनात काही गृहितके पुढील प्रमाणे मांडलेली आहेत.

१. आदिवासी जमातीतील स्त्री- पुरुषांचा समान पातळीवर सामाजिक विकास घडून यावा तसेच महिलांचे सक्षमीकरण घडावे यासाठी शासनाने अनेक शैक्षणिक योजना राबवण्याचा प्रयत्न केलेला आहे.

२. शासकीय योजनांच्या सदोष अंमलबजावणीमुळे व आदिवासी जमातींच्या अज्ञान व निरक्षरतेमुळे महिलांपर्यंत विकासाच्या योजना अजूनही पोहोचलेल्या नाहीत.

**माहितीचे विश्लेषण**

देशाचा सर्वांगीण विकास साध्य करायचा असेल तर सर्वप्रथम महिलांचा विकास घडवून आणला पाहिजे अशा प्रकारचे मत भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांनी व्यक्त केलेले आहे.चूल आणि मूल या पलीकडे महिलेची असलेले विश्व यापासून महिला खूप दूर आहे. जर महिलांचा सर्वांगीण विकास घडवून आणायचं असेल तर त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे अत्यंत गरजेचे आहे.हे लक्षात आल्यानंतर महात्मा फुले यांनी मुलींची पहिली शाळा पुण्यामध्ये काढली. परंतु आदिवासी जमातींच्या महिलांमध्ये ज्ञानाचा प्रकाश जाण्यासाठी अनेक वर्षे लागली या जमातीच्या महिला आजही शिक्षणापासून वंचित असलेल्या आपल्याला पहायला भेटतात. शिक्षण हे समाज विकासाचे प्रभावी साधन आहे. त्यासाठी 'शिक्षण सर्वांना मिळाले पाहिजे. असे मत देखील महात्मा फुले यांनी मांडलेली'. परंतु दुर्दैवाने देशातील सर्व समाज बांधवांना समान पातळीवर सामाजिक सुविधा आणि शिक्षण मिळणे हे केवळ अशक्य आहे. कुटुंबाचे असलेले दारिद्री आणि अज्ञान यामुळे देशातील बहुतांशी आदिवासी जमाती या शिक्षणापासून वंचित आहेत. म्हणून शासनाने वेगवेगळ्या प्रकारच्या शैक्षणिक धोरणांची आणि योजनांची अंमलबजावणी करून आदिवासी समाजातील स्त्री-पुरुषांचा समान पातळीवर विकास घडवून आणण्याचा मुलींच्या शिक्षणासाठी विशेष स्वरूपाच्या तरतुदी केल्या ही बाब अत्यंत गौरवास्पद आहे. काही निवडक आदिवासी जमातीमध्ये मातृसताक कुटुंबपद्धती असल्यामुळे कुटुंबातील सर्व निर्णय घेण्याचे अधिकार महिलांना असले तरी निरक्षरता आणि दारिद्रय व अज्ञान यामुळे आदिवासी महिला या शिक्षणाच्या प्रवाहामध्ये सहभागी होऊ शकले नाहीत. म्हणून शासकीय धोरणे आणि उपाययोजना या अत्यंत कल्याणकारी ठरतील. अशा प्रकारचे अपेक्षा बाळगून सरकारने आदिवासी महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध धोरणे आणि योजनांची अंमलबजावणी करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्याचा या प्रस्तुत लघुशोधनिबंध मध आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे

प्राचीन कालखंडात स्त्री-पुरुषांचा समान दर्जा असलेला दिसून येतो. स्त्रीला मानसन्मान दिला जात असे. एवढेच नव्हे तर देवदेवतांच्या रूपात देखील महिलांची पूजा केली जात असे. याची अनेक उदाहरणे विविध धार्मिक ग्रंथांमध्ये असलेले आपल्याला दिसून येतात. दुर्गा, सरस्वती, महाकाली, इत्यादी देवतांची पूजा आपण नेहमीच करतो. सीता स्वयंवर, द्रौपदी स्वयंवर, नलदमयंती स्वयंवर यावरून प्राचीन कालखंडामध्ये स्त्रियांना मानसन्मान दिला जात असे हे स्पष्ट होते. धर्मकारण, समाजकारण यामध्ये प्राचीन कालखंडात स्त्रियांना मानाचे स्थान होते परंतु आर्यांच्या आक्रमणानंतर भारतातील सामाजिक परिस्थिती बदलत गेली व स्त्रियांना अधिकार होते ते नष्ट करण्यात आले. "स्त्री नाइके न वास्तव्य"[2] म्हणजेच ज्या घराचे नेतृत्व स्त्री करते त्या घरात वास्तव्य करू नये अशा प्रकारच्या अनिष्ट रूढी प्रथा समाजात रूढ झालेल्या आणि स्त्री जीवनाला दास्यत्व प्राप्त झाले. स्मृती पुराण काळात तर स्त्रियांवर अनेक बंधने लादण्यात आली.

*पिता रक्षति कौमार्यः भ्राता रक्षति योवने ।*
*रक्षन्ति स्थाविरे पुत्रः न स्त्री-स्वातंत्र्य महती॥*

अशाप्रकारे भारतीय स्त्रियांची वेदोत्तर काळातील आणि मध्ययुगीन कालखंडातील महिलांची स्थिती दिसून येते. मुस्लिमांच्या आक्रमणानंतर भारतीय स्त्रियांची स्थिती अधिकच गंभीर बनली. रजिया सुलताना, लुलादेवी, राणी पद्मिनी, मुक्ताबाई, जनाबाई, महादंबा यासारख्या निवडक स्त्रिया सोडले तर स्त्री जीवनात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून जात होते.

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात विविध समाज सुधारकांनी केलेले प्रयत्न, तसेच इंग्रज सरकारने घेतलेल्या नवनवीन निर्णयामुळे भारतातील बालविवाह, सतीप्रथा यासारख्या चालीरीती बंद करण्याचा प्रयत्न करण्यात आला. यामध्ये प्रामुख्याने राजा राम मोहन रॉय, ईश्वरचंद्र विद्यासागर, स्वामी दयानंद सरस्वती,गोपाळ गणेश आगरकर, न्यायमूर्ती रानडे, महर्षी धोंडो केशव कर्वे, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान अत्यंत मोलाचे ठरते. त्यांनी केलेल्या प्रयत्नातून आजचे स्त्री जीवन सुखी समृद्ध

आणि संपन्नतेकडे मार्गक्रमण करत असलेले आपल्याला दिसून येते. समाजातील महिलांच्या मूलभूत गरजांची पूर्तता, आर्थिक सुरक्षितता, क्षमतांची निर्मिती, कौशल्यांची निर्मिती, महिलांचा सामाजिक स्तर उंचावणे, महिलांमध्ये आत्मविश्वास विश्वास आणि आत्मसन्मान निर्माण करणे, विचार व चिंतन करण्याची क्षमता प्रदान करणे, निर्णय क्षमतेत सहभाग घेणे, सामाजिक व आर्थिक जीवनातील सर्व क्षेत्रात समानतेची संधी देऊन त्यांचा सहभाग वाढवणे यासाठी विविध समाज सुधारक आणि शासनाने केलेले प्रयत्न अत्यंत उल्लेखनीय आहेत. यापेक्षा आदिवासी जमातीतील महिलांचे जीवन काही विशेष वेगळे नाही म्हणून आदिवासी महिलांच्या शैक्षणिक सक्षमीकरणासाठी सरकारने राबवलेल्या विविध योजना आणि धोरणांचा थोडक्यात आढावा या ठिकाणी पुढील प्रमाणे करण्यात आला आहे.

**शासनाचे शैक्षणिक धोरण आणि विविध योजना.**

**०१. घटनात्मक तरतुदी -**

अ. भारतीय राज्यघटनेतील कलम ४६ नुसार अनुसूचित जाती जमाती यांच्या शैक्षणिक व आर्थिक हितसंबंधाचे रक्षण केले आहे.

ब. भारतीय राज्यघटनेतील कलम ३४२ कलमान्वये नोटीफकेशन काढून आदिवासींना अनुसूचित जमाती म्हणून घोषित करण्यात आलेली आहे.

क. शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये म्हणून २००९ मध्ये मोफत व सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाचा कायदा पारित करण्यात आला त्यामुळे आदिवासी समुदायातील दारिद्र्यात जीवन जगणाऱ्या मुला मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात येण्याची संधी मिळाली सब पडे सब बडे हे घोषवाक्य घेऊन सरकारने या धोरणाची अंमलबजावणी केलेली दिसून येते.

**०२. कस्तुरबा गांधी विद्यालयाची स्थापना**

"जुलै २००४ मध्ये या शाळांची स्थापना करण्यात आली असून ,७५% जागा ह्या अनुसूचित जाती जमाती आणि इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक मुलींसाठी राखीव ठेवण्यात आलेली आहेत तर २५% जागा या दारिद्र्यरेषेखालील जीवन जगणाऱ्या मुलींसाठी राखीव ठेवण्यात आलेले आहेत. कस्तुरबा गांधी प्राथमिक विद्यालय या महाराष्ट्रातील ३६ तालुके व २० प्रमुख शहरांमधून असलेल्या आपल्याला दिसून येतात."[3]

**३.एकलव्य आदर्श रहिवासी शाळा योजना-**

"भारतीय राज्यघटनेतील कलम १७५(१) अन्वये राज्यांना मिळणाऱ्या अनुदानातून अनुसूचित जमाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी एकलव्य आदर्श निवासी शाळा स्थापन करण्यात आलेल्या आहेत. महाराष्ट्रात अशा सोळा शाळांची स्थापना करण्यात आली असून वीस हजारापेक्षा जास्त आदिवासी लोकसंख्या असलेल्या प्रत्येक तालुक्यामध्ये या शाळांची उभारणी करण्यात आलेली आहे. यामुळे आदिवासीबहुल भागातील विद्यार्थ्यांना त्यांच्या आसपासच्या परिसरात शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध करून देण्यात आली."[4]

**०४. मुलींच्या प्राथमिक शिक्षणासाठी राष्ट्रीय योजना -**

ही योजना २००३ पासून सुरू करण्यात आली असून, ज्या तालुक्यात ५०% पेक्षा जास्त अनुसूचित जाती आणि जमातीची लोकसंख्या आहे अश्या तालुक्यात या योजनांची अंमलबजावणी करण्यात आलेली आहे. त्या तालुक्यात प्रामुख्याने १० टक्केपेक्षा कमी महिला साक्षर असल्या पाहिजे अशा प्रकारची अट या योजनेमध्ये घालण्यात आलेली आहे.

**०५. प्रगती व सक्षम योजना -**

११ नोव्हेंबर २०१४ रोजी या दोन वेगवेगळ्या योजनांची सुरुवात करण्यात आली असून, प्रगती योजनेद्वारे मुलींना तांत्रिक शिक्षण घेण्यासाठी मदत केली जाते. तर सक्षम योजनेअंतर्गत अपंग मुलामुलींना तांत्रिक शिक्षण घेण्यात साठी मदत केली जाते. या योजनेचा लाभ सहा लाखापेक्षा कमी उत्पन्न असलेल्या अनुसूचित जाती जमाती व इतर मागास वर्ग प्रवर्गातील सर्व मुला-मुलींना या योजनेचा लाभ घेता येतो.

**०६. उडान योजना -**

१३ नोव्हेंबर २०१४ रोजी या योजनेची अंमलबजावणी करण्यात आली असून. अभियांत्रिकी क्षेत्रातील मुलींचा सहभाग वाढावा यासाठी मुलींना अभियांत्रिकी प्रवेश परीक्षेचे प्रशिक्षण या योजनेतून दिले जाते. आय.आय.टी., एन.आय.टी. प्रवेश घेण्यासाठी आर्थिक दृष्ट्या दुर्बल असलेल्या आणि अनुसूचित जाती जमातीच्या मुलींना या योजनेतून अर्थसहाय्य दिले जाते.

**०७. पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना -**

या योजनेची सुरुवात १३ ऑक्टोबर २०१६ रोजी करण्यात आली असून, या योजनेअंतर्गत अनुसूचित जमाती प्रवर्गातील बारावीनंतर शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना वस्तीगृहात प्रवेश न मिळाल्यास भोजन व निवासाची

सुविधा व शैक्षणिक साहित्य खरेदी करण्यासाठी आर्थिक मदत केली जाते.

०८. कायापालट योजना –

योजनेची सुरुवात २०१७ मध्ये करण्यात आली असून या योजनेअंतर्गत आदिवासी आश्रम शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनींना सोयीसुविधा पुरविण्यात येतात. त्यामध्ये मूलभूत सुविधांचा दर्जा सुधारणे, बरोबरच भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी ही योजना सुरू करण्यात आली आहे. या योजनेतून विद्यार्थी व शिक्षकांचे मूल्यमापन देखील केले जाते.

०९.शासकीय आश्रम शाळा –

आदिवासी जमातीच्या शैक्षणिक प्रगतीसाठी १९७२-७३ या शैक्षणिक वर्षापासून आदिवासीबहुल भागात दहावीपर्यंत शिक्षण देणाऱ्या शासकीय आश्रम शाळांची स्थापना करण्यात आलेली आहे. या शाळेत निवास भोजन, गणवेश, अंथरूण-पांघरूण, तसेच साबण-तेल सर्व काही सुविधा मोफत उपलब्ध करून दिल्या जाते. अशा प्रकारच्या ५५२ शाळा महाराष्ट्र राज्यामध्ये सध्या कार्यान्वित आहेत.

१०.अनुदानित आश्रम शाळा –

निमशासकीय तत्वावर विविध सेवाभावी संस्थांना चालवण्यासाठी दिलेल्या आदिवासी आश्रमशाळा या १९५३-५४ या वर्षापासून सुरु करण्यात आलेले आहेत. या आश्रम शाळेत देखील शासकीय आश्रम शाळेत प्रमाणेच सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. फक्त देखरेख आणि नियंत्रण हे संस्था आणि शासन यांचे संयुक्तपणे असते. महाराष्ट्र राज्यातील ज्या- ज्या तालुक्यांमध्ये आदिवासी लोकांची संख्या जास्त आहे अशा भागात अनुदानित आदिवासी आश्रमशाळांची उभारणी करण्यात आलेली आहे.

११.आदर्श आश्रम शाळा –

विविध संस्था मार्फत चालवल्या जाणाऱ्या अनुदानित आश्रम शाळा व शासकीय आश्रम शाळेतील हुशार व प्रज्ञावंत विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यानिकेतन च्या धर्तीवर आदर्श आश्रम शाळेची सुरुवात 1991 या शैक्षणिक वर्षापासून करण्यात आली असून भंडारदरा व देवमोगरा या दोन ठिकाणी पाचवी ते दहावीपर्यंत शिक्षण देणाऱ्या आदर्श आश्रम शाळेची स्थापना करण्यात आलेली आहे.

१२.नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये प्रवेश –

"आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना शहरातील बारावीपर्यंतच्या इंग्रजी माध्यमांच्या नामांकित शाळांमध्ये प्रवेश मिळावा यासाठी येणारा खर्च आदिवासी विकास विभागामार्फत करण्यात येतो. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय अंतर्गत या विद्यार्थ्यांची निवड करून ,त्यांना नामांकित शाळेमध्ये मोफत प्रवेश मिळवून दिला जातो. प्रत्येक प्रकल्प अधिकाऱ्याला १०० विद्यार्थ्यांचे उद्दिष्ट ठरवून देण्यात आलेले आहे. त्यामुळे अनुसूचित जमातीच्या मुलींना उच्च दर्जाच्या नामांकित शाळांमध्ये शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झालेली आहे."[5]

१३. गोंडवाना विद्यापीठाची स्थापना –

"चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील आदिवासी क्षेत्रातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची सोय त्यांच्या परिसरात निर्माण व्हावी म्हणून गोंडवाना विद्यापीठाची स्थापना करण्यात आलेली आहे त्यासाठी 25 कोटी रुपयांचा आर्थिक निधी आदिवासी विभागाकडून करून देण्यात आलेला आहे. या विद्यापीठाचा फायदा आदिवासी जमातीतील मुलींना होत असलेला दिसून येतो."[6]

१४. आदिवासी मुला- मुलींकरता शासकीय वस्तीग्रह-

"अनुसूचित जमातीच्या मुला मुलींकरता कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालय व व्यवसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी मुला मुलींचे स्वतंत्र वस्ती कराची स्थापना करण्यात आलेली आहे .या वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्व दैनंदिन गरजा शासनामार्फत मोफत पूर्ण केल्या जातात. त्यामुळे अनुसूचित जमातीच्या मुलींना शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झालेली आहे."[7]

१५. भारत सरकार शालांत परीक्षेत तर शिष्यवृत्ती योजना –

दहावी नंतर कला, वाणिज्य, विज्ञान, व्यवसायिक वैद्यकीय, अभियांत्रिकी औद्योगिक शिक्षण प्रशिक्षण संस्थेमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या दैनंदिन निर्वह खर्च भागवण्यासाठी भारत सरकार मार्फत शालांत परीक्षेत्तोर शिष्यवृत्ती दिली जाते. या योजनेमधून मिळणाऱ्या पैशांमध्ये विद्यार्थ्यांना वह्या पुस्तके आवश्यक पोशाख खरेदी तसेच निवासाची व्यवस्था करता येते. त्यामुळे अनुसूचित जमातीच्या मुलींना शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झालेली आहे.

शाळेतील गळती व स्थगिती थांबविण्यासाठी प्रोत्साहनपर भत्ता.आदिवासी भागातील वाडी वस्ती तांड्यावरील मुलींची शाळेतील

१६.गळती व स्थगिती थांबवण्यासाठी

२००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून या योजनेची सुरुवात करण्यात आलेली आहे. इयत्ता पहिली ते पाचवी या वर्गातील विद्यार्थ्यांची मासिक उपस्थिती सत्तर टक्के असणे

अनिवार्य .त्या विद्यार्थ्यांना दरमहा ५० रुपये दिले जातात तर आठवी ते दहावीतील विद्यार्थ्यांना दरमहा १०० रुपये प्रोत्साहनपर भत्ता दिला जातो. याबाबत त्याच्या प्रलोभनाला मुळे बहुतांशी आदिवासी जमातीतील लोक आपल्या मुलींना शाळेत पाठवत असलेल्या दिसून येतात त्यामुळे शाळेतील गळती आणि स्थगितीचे प्रमाण घटत असलेले दिसून येते. त्यामुळे अनुसूचित जमातीच्या मुलींना शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झालेली आहे.

**१७. स्वाती अभय योजना –**

"या योजनेची सुरुवात एक नोव्हेंबर २०१५ पासून मराठवाड्यात करण्यात आली असून, शिक्षण घेण्यासाठी शाळा महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनीसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसच्या मोफत पास देण्यास सुरुवात करण्यात आलेली आहे. स्वाती पिटले या विद्यार्थिनीने शाळेत जाण्यासाठी बसची पास काढण्यासाठी पैसे नसल्यामुळे आत्महत्या केली होती. म्हणून तिच्या स्मरणार्थ स्वाती अभय योजना सुरुवात करण्यात आलेली आहे. या योजनेमुळे आदिवासी जमातीतील आर्थिक दृष्ट्या अत्यंत वाईट परिस्थिती असलेल्या मुलींना या योजनेचा फायदा मिळाला. आदिवासीबहुल भागातील मुली मोफत पास लाभ घेऊन तालुक्याच्या ठिकाणी शाळा-महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेताना दिसून येतात."[८]

सारांश-

आदिवासी जमातीतील महिलांना शैक्षणिक प्रवाहामध्ये आणण्यासाठी शासनाने राबवलेल्या विविध योजनांमध्ये प्रामुख्याने कस्तुरबा गांधी विद्यालयाची स्थापना, एकलव्य आदर्श निवासी शाळा, योजना प्रगती व सक्षम योजना, पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना, शासकीय आश्रम शाळा, अनुदानित आश्रम शाळा, आदर्श आश्रम शाळा यांची स्थापना केली. त्याचबरोबर नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये आदिवासी जमातीतील मुला-मुलींना प्रवेशाची संधी उपलब्ध करून दिली. एवढेच नव्हे तर उच्च शिक्षणासाठी गोंडवाना विद्यापीठाची स्थापना देखील करण्यात आली. यासारख्या विविध योजनांच्या माध्यमातून आदिवासी महिलांचा सर्वांगीण विकास घडवून आणून, त्यांना विकासाच्या प्रवाहामध्ये सामील करण्याचा प्रयत्न शासकीय पातळीवर करण्यात आलेला आहे. ही बाब कौतुकास्पद असली तरी अजूनही बहुतांशी वाडी, वस्ती, तांड्यावरील आदिवासी मुलींच्या शिक्षणासंदर्भात सकारात्मकता दिसून येत नाही. यासंदर्भात विशेष पावले उचलणे काळाची गरज आहे, असे वाटते. कारण विविध योजनांचा लाभ अत्यल्प प्रमाणात आदिवासी जमातीच्या लोकांनी घेतलेला आहे. बहुतांशी आदिवासी समुदाय हा शासनाच्या विविध योजनांपासून कोसो दूर असलेला दिसून येतो.

भारतातील मूळ निवासी असलेल्या आदिवासी जमातीच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक स्थितीमध्ये झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे आणि आदिवासी जमातीतील विविध स्वरूपाच्या सामाजिक समस्या आढावा घेऊन त्यांना विकासाच्या प्रवाहमध्ये सहभागी करून गेतल्यास त्यांचा समान सामाजिक विकास घडून येईल अन्यथा श्रीमंत श्रीमंत होत जातील आणि गरीब गरीबच राहतील. जर आपल्याला दहशतवादी घडवायचे नसतील तर विकासाच्या प्रवाहापासून दूर असलेल्या आदिवासी जमातीचा समान पातळीवर सामाजिक विकास घडवून आणणे अत्यंत गरजेचे आहे असे मला वाटते.

निष्कर्ष –

१. शालेय शिक्षणाची सोय व्हावी म्हणून आदिवासीबहुल भागात शासकीय व निमशासकीय आदिवासी आश्रमशाळा स्थापन करण्यात आल्यामुळे शिक्षण घेण्याची व्यवस्था निर्माण झालेली आहे.
२. भारत सरकार शिष्यवृत्ती योजने मधून दिल्या जाणाऱ्या पैशातून शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींच्या दैनंदिन गरजांची पूर्तता केली जाते, तसेच विशेष भत्ता, प्रोत्साहनपर भत्ता इत्यादी तरतुदी केल्यामुळे शैक्षणिक संधी उपलब्ध झालेले आहेत.
३. आदिवासी जमातीतील गुणवंत मुलीसाठी विशेष शाळेची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते.
४. शासकीय पातळीवर राबवल्या जाणाऱ्या योजना अतिशय दर्जेदार असले तरी आदिवासी जमातीच्या अज्ञान व निरक्षर त्यामुळे बहुतांशी आदिवासी जमाती या योजनांपासून दूर असलेल्या दिसून येतात त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रबोधनाची गरज आहे.

अनिवार्य .त्या विद्यार्थ्यांना दरमहा ५० रुपये दिले जातात तर आठवी ते दहावीतील विद्यार्थ्यांना दरमहा १०० रुपये प्रोत्साहनपर भत्ता दिला जातो. याबाबत त्याच्या प्रलोभनाला मुळे बहुतांशी आदिवासी जमातीतील लोक आपल्या मुलींना शाळेत पाठवत असलेल्या दिसून येतात त्यामुळे शाळेतील गळती आणि स्थगितीचे प्रमाण घटत असलेले दिसून येते. त्यामुळे अनुसूचित जमातीच्या मुलींना शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झालेली आहे.

**१७. स्वाती अभय योजना –**

"या योजनेची सुरुवात एक नोव्हेंबर २०१५ पासून मराठवाड्यात करण्यात आली असून, शिक्षण घेण्यासाठी शाळा महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या बसेसच्या मोफत पास देण्यास सुरुवात करण्यात आलेली आहे. स्वाती पिटले या विद्यार्थिनीने शाळेत जाण्यासाठी बसची पास काढण्यासाठी पैसे नसल्यामुळे आत्महत्या केली होती. म्हणून तिच्या स्मरणार्थ स्वाती अभय योजना सुरुवात करण्यात आलेली आहे. या योजनेमुळे आदिवासी जमातीतील आर्थिक दृष्ट्या अत्यंत वाईट परिस्थिती असलेल्या मुलींना या योजनेचा फायदा मिळाला. आदिवासीबहुल भागातील मुली मोफत पास लाभ घेऊन तालुक्याच्या ठिकाणी शाळा-महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेताना दिसून येतात."[८]

**सारांश-**

आदिवासी जमातीतील महिलांना शैक्षणिक प्रवाहामध्ये आणण्यासाठी शासनाने राबवलेल्या विविध योजनांमध्ये प्रामुख्याने कस्तुरबा गांधी विद्यालयाची स्थापना, एकलव्य आदर्श निवासी शाळा, योजना प्रगती व सक्षम योजना, पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयंम योजना, शासकीय आश्रम शाळा, अनुदानित आश्रम शाळा, आदर्श आश्रम शाळा यांची स्थापना केली. त्याचबरोबर नामांकित इंग्रजी माध्यमांच्या शाळांमध्ये आदिवासी जमातीतील मुला-मुलींना प्रवेशाची संधी उपलब्ध करून दिली. एवढेच नव्हे तर उच्च शिक्षणासाठी गोंडवाना विद्यापीठाची स्थापना देखील करण्यात आली. यासारख्या विविध योजनांच्या माध्यमातून आदिवासी महिलांचा सर्वांगीण विकास घडवून आणून, त्यांना विकासाच्या प्रवाहामध्ये सामील करण्याचा प्रयत्न शासकीय पातळीवर करण्यात आलेला आहे. ही बाब कौतुकास्पद असली तरी अजूनही बहुतांशी वाडी, वस्ती, तांड्यावरील आदिवासी मुलींच्या शिक्षणासंदर्भात सकारात्मकता दिसून येत नाही. यासंदर्भात विशेष पावले उचलणे काळाची गरज आहे, असे वाटते. कारण विविध योजनांचा लाभ अत्यल्प प्रमाणात आदिवासी जमातीच्या लोकांनी घेतलेला आहे. बहुतांशी आदिवासी समुदाय हा शासनाच्या विविध योजनांपासून कोसो दूर असलेला दिसून येतो.

भारतातील मूळ निवासी असलेल्या आदिवासी जमातीच्या सामाजिक, धार्मिक, राजकीय, आर्थिक स्थितीमध्ये झालेल्या परिवर्तनाचा अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे आणि आदिवासी जमातीतील विविध स्वरूपाच्या सामाजिक समस्या आढावा घेऊन त्यांना विकासाच्या प्रवाहमध्ये सहभागी करून गेतल्यास त्यांचा समान सामाजिक विकास घडून येईल अन्यथा श्रीमंत श्रीमंत होत जातील आणि गरीब गरीबच राहतील. जर आपल्याला दहशतवादी घडवायचे नसतील तर विकासाच्या प्रवाहापासून दूर असलेल्या आदिवासी जमातीचा समान पातळीवर सामाजिक विकास घडवून आणणे अत्यंत गरजेचे आहे असे मला वाटते.

**निष्कर्ष –**

१. शालेय शिक्षणाची सोय व्हावी म्हणून आदिवासीबहुल भागात शासकीय व निमशासकीय आदिवासी आश्रमशाळा स्थापन करण्यात आल्यामुळे शिक्षण घेण्याची व्यवस्था निर्माण झालेली आहे
२. भारत सरकार शिष्यवृत्ती योजने मधून दिल्या जाणाऱ्या पैशातून शिक्षण घेणाऱ्या मुला-मुलींच्या दैनंदिन गरजांची पूर्तता केली जाते, तसेच विशेष भता, प्रोत्साहनपर भत्ता इत्यादी तरतुदी केल्यामुळे शैक्षणिक संधी उपलब्ध झालेले आहेत.
३. आदिवासी जमातीतील गुणवंत मुलीसाठी विशेष शाळेची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यामुळे त्यांचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते.
४. शासकीय पातळीवर राबवल्या जाणाऱ्या योजना अतिशय दर्जेदार असले तरी आदिवासी जमातीच्या अज्ञान व निरक्षर त्यामुळे बहुतांशी आदिवासी जमाती या योजनांपासून दूर असलेल्या दिसून येतात त्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी प्रबोधनाची गरज आहे.

५. शासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या उदासीनतेमुळे विविध स्वरूपाचे शासकीय योजना आणि धोरणे राबवण्यात मध्ये अनेक उणिवा निर्माण होत असलेले दिसून येतात. बहुतांश शासकीय आदिवासी योजनांचा लाभ सुवर्ण जातीतील लोक घेत असलेले दिसून येतात.

**शिफारशी**

१. विकासाच्या प्रक्रियेतील आदिवासी जमातींचा अभ्यास करणे
२. आदिवासी जमातीच्या आरोग्यविषयक समस्यांचा अभ्यास करणे
३. आदिवासी जमातीच्या राजकारणातील सहभागाचे अवलोकन करणे
४. आदिवासी जमातीच्या आर्थिक स्थितीत झालेल्या बदलाचा आढावा घेणे.

**संदर्भ सूची-**

१. एस जी देवगावकर, (२०१६)आदिवासी विकास आणि प्रशासन श्री साईनाथ प्रकाशन नागपूर पृष्ठ क्र.१६३
२. पवार दीपक, (२०१३), महिलांचे राजकीय समीकरण, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, पृष्ठ क्र.१०
३. स्वप्नील रावडे अभिजित जगताप व इतर (२०२१) शासकीय योजना ज्ञानदीप पब्लिकेशन पुणे पृष्ठ क्र.१०
४. किता पृष्ठ क्र.०९
५. माहितीपुस्तिका, आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र राज्य २०११-१२ पृष्ठ क्र. १४
६. एसजी देवगावकर, उपरोक्त, पृष्ठ क्र.१८८
७. किता, पृष्ठ क्र.१९१
८. लोकराज्य मासिक (२०१३) वेद विकासाचा- आदिवासी विकास विशेषांक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मुंबई,पृष्ठ क्र.१३
९. स्वप्नील रावडे अभिजित जगताप आणि इतर उपरोक्त पृष्ठ क्र.१३.